# राष्ट्रीय आरोग्य अभियान जाहिरात सन २०२५-२६

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंबकल्याण सोसायटी रत्नागिरी

रत्नागिरी जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंबकल्याण सोसायटी यांचेतर्फे उमेदवारांकडुन निव्वळ करार तत्वावर खालील पदांसाठी विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. सदरचे अर्ज टपालाने किंवा प्रत्यक्ष जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, आरोग्य विभाग, जि.प.रत्नागिरी या कार्यालयाकडे सादर करावे.

| क्र. | पदाचे नांव | पदस्थापनेचे ठिकाण | पात्रता | अनुभव | पदांची संख्या | आरक्षणानुसार भरावयाचे पद | मासिक एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | District Program Manager | Zilla Parishad Ratnagiri | MBBS/ any Medical Graguate with MPH/MHA/ MBA in Health | Minimum 1 Year of Experience | 1 | SEBC | 35,000/- |

पदभरती जाहिरात व अर्जाचा नमुना जिल्हयाच्या संकेतस्थळावर https://ratnagiri.gov.in & https://zpratnagiri.gov.in प्रसिद्ध करण्यात येणार आहे. तसेच पदभरती विषयक पुढील सुचनाही याच संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत येतील. याबाबत अर्जदारास कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**सुचनाः**

१) जाहिरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपाची आहेत.

२) निवड झालेल्या उमेदवाराला ११ महिने २९ दिवसाकरीता कंत्राटी पद्धतीने नेमणूक देण्यात येईल.

३) निवड झालेल्या उमेदवारांना समितीने तयार केलेल्या अटी व शर्ती मान्य कराव्या लागतील तसेच रु.१००/- च्या बॉण्डपेपरवर करारनामा सादर करावा लागेल.

४) अनुभवासंबंधी प्रमाणपत्र जोडले नसल्यास अनुभव ग्राहय धरला जाणार नाही.

५) **वयोमर्यादा** - सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय,मुंबई यांचे दि. २५.०४.२०१६ चे शासन निर्णयानुसार अर्ज करण्याच्या अर्ज स्विकृतीच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे वय १८ पेक्षा कमी नसावे व कमाल वयोमर्यादेपेक्षा जास्त नसावे.

६) खुल्या प्रवर्गासाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्षे व राष्ट्रीय आरोग्य अधिकारी अंतर्गत कर्मचाऱ्यांसाठी ५ वर्षे शिथिल.

७) सदरहु जाहिरातीस अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज विहित मुदतीत प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापुर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

८) निवड प्रक्रियेतील पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तसेच निवड यादी रत्नागिरीच्या एनआयसीच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करणेत येईल.

९) पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये.

१०) निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार अपात्र ठरविला जाईल.

११) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रद्द करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकारी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणालाही काणेताही दावा करता येणार नाही.

१२) राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत दि.०१.०७.२००५ च्या शासन निर्णयानुसार लहान कुटुंबाची अट लागु करणेत आली असुन, अर्जाच्या नमुन्यासोबत जोडण्यात आलेले लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे बंधनकारक राहील.

**आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती –**

१) शैक्षणिक अर्हतेबाबतची मार्कशिट व प्रमाणपत्रे (सेमिस्टर पॅटर्न असणाऱ्याा उमेदवाराने अर्जावरती मार्क्स नमुद करताना सरासरी गुण नमुद करावे.)

२) शाळा सोडल्याचा दाखला/जन्मतारखेचा दाखला.

३) शासकीय/निमशासकीय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र

४) रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र

५) जात प्रमाणपत्रची सांक्षाकिंत प्रत

**अर्ज करण्याची पध्दत :**

१) इच्छुक उमेदवारांनी सोबत दिलेल्या नमुन्याता ए ४ आकाराच्या पांढऱ्या जाड कागदावर एका बाजुस टंकलिखीत अथवा मुद्रीत करुन सुवाच्य अक्षरात भरलेला अर्ज सादर करावा.

२) लिफाफयावर पदाचे नाव व युनिटचे/कक्षाचे नाव ठळक अक्षरात नमुद करावे.

३) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रु.१५०/- अर्ज शुल्क भरणे आवश्यक आहे. अर्ज शुल्क हे ऑनलाईन पध्दतीने (फोन पे/जीपे/युपीआय/इंटरनेट बॅकिंग/मोबाईल बॅकिंग) ने खाते क्रमांक **11149266074** स्टेट बॅक ऑफ इंडिया **District Integrated Health & family welfare Society Ratnagiri** आयएफएससी कोड **SBIN0000467** मध्ये भरणा करुन त्याचा **UTI/UTR Transaction No.** अर्जामध्ये स्पष्ट नमुद करणे बंधनकारक आहे. तसेच प्रत्यक्ष अर्जासोबत ऑनलाईन भरणा केलेल्या रक्कमेची पावती जोडणे बंधनकारक आहे. अन्यथा अर्ज अपात्र करण्यात येईल.

४) उमेदवारांनी **दि.१६/०४/२०२५** पर्यंत कार्यालयीन वेळेच्या आत सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात अर्ज आवश्यक गुणपत्रांच्या व प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, आरोग्य विभाग, जि.प.रत्नागिरी यांचे कार्यालयात प्रत्यक्ष किंवा टपालाने पोहोच करणे गरजेचे आहे.

**खालील उणिवा असलेले अर्ज नाकारण्यात येतील :**

१) विहित पात्रता धारण न करणा-या उमेदवारांचे अर्ज.

२) विहित नमुन्यात नसलेले किंवा योग्य प्रकारे न केलेले अर्ज.

३) मजकूर अपूर्ण किंवा चुकीचा भरलेला अर्ज, खाडाखोड केलेला अर्ज.

४) स्वाक्षरी नसलेले, आवश्यक गुणपत्रकांच्या व प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती नसलेले अर्ज अगर तत्सम माहिती

वरीलप्रमाणे कोणत्याही बाबतीत त्रुटी असल्यास आपला अर्ज नाकारण्यात येईल व त्याबाबतीत आपल्याशी कोणताही पत्रव्यवहार केला/ स्विकारला जाणार नाही.

टिप : उपरोक्त पदसंख्येत बदल करणे तसेच पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करण्याचे संपुर्ण अधिकार निवड समितीने राखून ठेवलेले आहेत.

(डॉ.अनिरुद्ध आठल्ये)
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, रत्नागिरी
तथा सदस्य सचिव
जिल्हा स्तरीय पदभरती समिती
रत्नागिरी

(श्रीम. वैदेही रानडे, भा.प्र.से. )
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी
तथा अध्यक्ष
जिल्हा स्तरीय पदभरती समिती
रत्नागिरी